आमच्या परिवाराचा आधारवड हरपला

दादा, तुमच्या आठवणींचा ठेवा आयुष्यभर हृदयात जपून ठेवू



॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

चंदनापुरी येथील शेतकरी कुटुंबात कै. किसन राजाराम राहणे यांच्या पोटी सर्वांत मोठा मुलगा म्हणून पुंजा किसन राहणे (दादा) यांचा जन्म १ जानेवारी १९४९ रोजी झाला. नुकतेच २८ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने राहणे परिवाराचा आधारवड कोसळला असून, आमच्या आयुष्यात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. आम्ही सर्वजण त्यांना प्रेमाने 'दादा' म्हणत असू. आई-वडील, पाच बहिणी आणि एक भाऊ असा त्यांचा मोठा परिवार होता. कुटुंबातील सर्वांत मोठे असल्याने लहान वयातच त्यांच्यावर जबाबदाऱ्यांचे ओझे आले. शेतकरी कुटुंबातील परिस्थितीमुळे त्यांचे शिक्षण पाचवीपर्यंतच झाले. मात्र, शिक्षणापेक्षा अनुभवातून मिळालेले ज्ञान, कष्टाची शिकवण आणि जीवनमूल्ये हीच त्यांची खरी संपत्ती होती. वडील किसन राजाराम राहणे हे कष्टाळू व धार्मिक वृत्तीचे शेतकरी होते. त्यांच्याकडून दादांनी शेतीचे संस्कार आणि मेहनतीचे बाळकडू घेतले.

लहानपणापासूनच दादांनी शेतीत स्वतःला झोकून दिले. त्या काळात बैलांच्या साह्याने शेती केली जात असे. विहीर खोदणे, शेताचे बांध सपाट करणे, पिकांना पाणी देणे अशा कष्टाच्या कामांत त्यांनी आयुष्य घालवले. उत्तम बैलजोडी, शेतीची दर्जेदार अवजारे आणि बैलगाडी यांची त्यांना विशेष आवड होती. आजही त्यांनी जपून ठेवलेली शेतीची अवजारे त्यांच्या शेतीप्रेमाची साक्ष देतात. शेती ही आपली आई आहे, तीच आपला उदरनिर्वाह करते, हा त्यांचा विचार आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.


पाचही बहिणींची लग्ने चांगल्या घराण्यांत करून देत त्यांनी मोठ्या भावाची जबाबदारी समर्थपणे पार पाडली. या संपूर्ण प्रवासात पत्नी अनुसया यांनी त्यांना मोलाची साथ दिली. दोघांनी कष्ट, प्रेम, त्याग आणि विश्वासाच्या बळावर संसार फुलवला. दादांचा स्वभाव अतिशय शांत, संयमी आणि प्रेमळ होता. कोणालाही दुखावणे त्यांच्या स्वभावात नव्हते. मोठेपणाचा आव न आणता साधेपणाने जगणे, हेच त्यांचे वैशिष्ट्य होते. दादांना फारसे शिक्षण घेता आले नाही, याची खंत त्यांनी आपल्या मुलांच्या बाबतीत कधीही राहू दिली नाही. मोठा मुलगा रामदास याला एम.ए., बी.एड.पर्यंत शिक्षण देऊन शिक्षक म्हणून उभे केले. दुसरा मुलगा लक्ष्मण याला दहावीपर्यंत शिक्षण देऊन शेती व दुग्धव्यवसायात सक्षम केले. मुलगी मनीषा हिलाही दहावीपर्यंत शिक्षण दिले. नातवंडांनी उच्च शिक्षण घेऊन नोकरीत स्थिरस्थावर व्हावे, हे पाहणे त्यांच्या आयुष्यातील समाधानाचे क्षण होते. त्यांनी आम्हाला केवळ वाढवले नाही, तर प्रामाणिकपणा, कष्ट, माणुसकी आणि कुटुंबाची एकजूट यांचे संस्कार दिले.

१९८५ मध्ये त्यांनी फिलिप्स कंपनीचा रेडिओ घेतला होता. सायंकाळी संपूर्ण कुटुंब एकत्र बसून रेडिओवरील कार्यक्रम ऐकत असे. त्या छोट्या-छोट्या क्षणांतून निर्माण झालेला आनंद आज आठवणींच्या रूपाने मनात घर करून आहे. दादांच्या पाचही बहिणी त्यांना भेटण्यासाठी येत असत. भावंडांमधील प्रेम आणि आपुलकीचा धागा त्यांनी कायम जपला. मोठा मुलगा म्हणून दादांच्या जाण्याचे दुःख शब्दांत व्यक्त करणे माझ्यासाठी अत्यंत कठीण आहे. ज्या हातांनी माझे बालपण सांभाळले, ज्या मायेच्या सावलीत मी वाढलो, ज्या व्यक्तीने माझ्या आयुष्याला दिशा दिली, तोच माझा आधार आज हरपला आहे. आयुष्यात कितीही मोठे यश मिळवले, तरी वडिलांच्या आशीर्वादाची उणीव कायम जाणवणार आहे. आज घरात सर्व काही आहे, पण दादा नाहीत ही जाणीव मनाला असह्य वेदना देते. दादा, तुम्ही आयुष्यभर कष्ट केले, कुटुंबासाठी जगलात आणि आम्हाला संस्कारांची अनमोल शिदोरी दिलीत. तुमच्या त्यागाची परतफेड आम्ही कधीच करू शकणार नाही. तुम्ही दिलेले संस्कार, तुमची शिकवण आणि तुमच्या आठवणी हाच आमचा खरा वारसा आहे. तुमच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही. मात्र, तुम्ही दाखवलेल्या मार्गावर चालत राहणे, हेच तुमच्याप्रती आमचे खरे कर्तव्य असेल.

आज मनातून एकच आर्त हाक उमटते
दादा, तुम्ही परत या

तो हसरा चेहरा आता दिसणार नाही, मायेचा हात आता डोक्यावर फिरणार नाही. मनाचा तो भोळेपणा, कधीच केला नाही मोठेपणा. कष्टांतून उभे केले घर, तुमच्याविना झाले आज पोरके. अचानक निघून गेला प्राण, आठवणींनी भरले मन. पुनर्जन्म घ्यावा हीच आमची प्रार्थना, तुमच्या चरणी अर्पण करतो भावपूर्ण श्रद्धांजली. दादा, तुम्ही आमच्यात नसाल, पण आमच्या प्रत्येक श्वासात, प्रत्येक आठवणीत आणि प्रत्येक संस्कारात कायम जिवंत राहाल.

– आर. पी. राहणे सर (मोठा मुलगा)



दूध उत्पादकांच्या आर्थिक हिताला प्राधान्य

थोरात डेअरीकडून १७.३१ कोटींचे वितरण


मा. आबासाहेब थोरात


मा. पृथ्वीराज थोरात


मा. देवराज थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : एस. आर. थोरात मिल्क प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड या दूध उद्योग समूहाने दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताला प्राधान्य देत दूध दरफरक, ३१ ऑक्टोबर पर्यंतचे आगाऊ पेमेंट, वाहतूक भाडे, वितरक कमिशन, कर्मचारी पगार आणि बोनस अशा विविध माध्यमांतून एकूण १७ कोटी ३१ लाख रुपयांची रक्कम दूध उत्पादक सभासदांच्या बँक खात्यावर वर्ग केली आहे. शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळावे यासाठी गेली ३३ वर्ष समूह सातत्याने प्रयत्नशील आहे. अशी घोषणा संस्थेचे चेअरमन मा. श्री. आबासाहेब थोरात यांनी केली.

तसेच थोरात डेअरीने नेहमीच गुणवत्तापूर्ण दूध संकलन, स्वच्छता आणि पारदर्शक व्यवहारांच्या माध्यमातून शेतकरी व ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. महाराष्ट्रात दूध व दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ व बनावटपणाला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त मा. श्री. तुकाराम मुंढे साहेब यांनी केलेल्या प्रभावी कार्यवाहीमुळे शुद्ध व गुणवत्तापूर्ण दूध आणि दुग्धजन्य पदार्थांची मागणी वाढण्यास मदत झाली आहे. याचा सकारात्मक परिणाम दूध उत्पादक शेतकऱ्यांवर झाला असून, त्यांना वर्षभर उचांकी व सातत्यपूर्ण दूध खरेदी दर देण्यास शक्य झाले.

चालू आर्थिक वर्षातही दूध उत्पादनाचा खर्च आणि शेतकऱ्यांचे आर्थिक हित लक्षात घेऊन वर्षभर स्थिर व उच्च दूध खरेदी दर देण्यावर समूहाने विशेष भर दिला आहे. तसेच, शेतकऱ्यांचा पशुखाद्यावरील खर्च कमी करण्याच्या दृष्टीने २५ टक्के प्रथिने असलेले 'गगनगिरी डायमंड' आणि २२ टक्के प्रथिने असलेले 'गगनगिरी गोल्ड' हे पशुखाद्य वाजवी दरात उपलब्ध करून देण्यात आले आहे.

बैठकीस संबोधित करताना संस्थेचे संचालक श्री. पृथ्वीराज थोरात यांनी सध्या निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे पाणीटंचाई, जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध करणे आणि पशुधनाचे आरोग्य जपणे ही शेतकऱ्यांसमोरील प्रमुख आव्हाने असल्याचे नमूद केले. सद्यस्थितीतील दुष्काळाचे परिणाम केवळ पुढील पावसाळ्यापर्यंत मर्यादित न राहता शेतीचे उत्पादन पूर्वपदावर येऊन संपूर्ण कृषी उत्पादन चक्र सुरळीत होईपर्यंत जाणवू शकतात. मागील काही वर्षांतील अनुभव पाहता, एका दुष्काळी हंगामाचा परिणाम सलग दोन हंगामांवर झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी दीर्घकालीन परिस्थितीचा विचार करून जनावरांसाठी पाणी व चारा नियोजन, पशुसंवर्धन आणि उपलब्ध शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे नियोजन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

संचालक मा. श्री. देवराज थोरात यांनी माहिती देताना दुग्धव्यवसायातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढावा आणि पशुपालकांना शास्त्रीय पद्धतीने मार्गदर्शन मिळावे, यासाठी उद्योग समूहा मार्फत जनावरांचे संगोपन, योग्य आहार व्यवस्थापन, आरोग्याची काळजी आणि दूध उत्पादनवाढ याविषयी माहितीपर व्हिडिओ तयार करून सर्व सोशल मीडिया माध्यमांवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. शासनाच्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी समूहाचे 'मी शेतकरी' आणि 'संकलन पॉइंट' या पच्या माध्यमातून महत्त्वाचे अपडेट्स दिले जात आहेत.

दिवाळीच्या शुभेच्छा : एस. आर. थोरात डेअरी च्या वतीने सर्व दूध उत्पादक शेतकरी बांधव, पशुवैद्यकीय डॉक्टर तसेच दुग्धव्यवसायाशी संबंधित सर्व घटकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा! सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि भरभराट नांदो, अशी सदिच्छा संस्थेचे चेअरमन यांनी व्यक्त केली.

मेडिकव्हर हॉस्पिटलतर्फे ग्रामिण रुग्णालय घुलेवाडी येथे सहा बॅरिकेटस्



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ग्रामीण रुग्णालय, घुलेवाडी (ता. संगमनेर) येथे रुग्णालय परिसरात वारंवार होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता वाहतूक नियंत्रणासाठी बॅरिकेड्सची आवश्यकता असल्याचे ग्रामीण रुग्णालयाचे मेडिकल ऑफिसर डॉ. राजकुमार जऱ्हाड यांनी मेडिकव्हर हॉस्पिटलकडे व्यक्त केले होते. ही गरज लक्षात घेऊन मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेरच्या सेंटर हेड डॉ. स्नेहल गायके यांच्या पुढाकारातून ग्रामीण रुग्णालय, घुलेवाडी येथे वाहतूक नियंत्रणासाठी सहा बॅरिकेड्स प्रदान करण्यात आले.

या उपक्रमामुळे ग्रामीण रुग्णालय परिसरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत होण्यास मदत होणार असून रुग्ण, त्यांचे नातेवाईक तसेच रुग्णालयातील आरोग्य कर्मचाऱ्यांनाही याचा लाभ होणार आहे. या प्रसंगी ग्रामीण रुग्णालयाचे मेडिकल ऑफिसर डॉ. राजकुमार जऱ्हाड, डॉ. राहुल पारधी, तसेच ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी कैलास चव्हाण, शब्बीर शेख, वाडेकर सिस्टर व नर्सिंग स्टाफ उपस्थित होते. मेडिकव्हर हॉस्पिटलच्या वतीने सेंटर हेड डॉ. स्नेहल गायके, सुशील टोकसे, दिपक जाधव, सुशील रोहकले आणि संतोष गोडसे उपस्थित होते. विशेष म्हणजे, मागील महिन्यात गणेशोत्सवाच्या शुभमुहूर्तावर मेडिकव्हर हॉस्पिटलतर्फे संगमनेर पोलीस स्टेशनलाही वाहतूक व गर्दी नियंत्रणासाठी बॅरिकेड्स प्रदान करण्यात आले होते. याचबरोबर परिसरातील विविध सामाजिक गरजा ओळखून मेडिकव्हर हॉस्पिटलच्या वतीने वेळोवेळी असे विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येतात.

मेडिकव्हर हॉस्पिटल नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत समाजाच्या विविध गरजांसाठी मदत व सहकार्य करण्यास तत्पर असते. आरोग्यसेवेबरोबरच सामाजिक उत्तरदायित्व जपत समाजहितासाठी असे उपक्रम यापुढेही सातत्याने सुरू राहतील, असे मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेरच्या वतीने सांगण्यात आले.

शंभर वर्षांचा विश्वास, शुद्धतेची परंपरा

दंडे गोल्ड अँड डायमंड्सचा सुवर्णप्रवास!

परंपरेचा वारसा, आधुनिकतेची जोड आणि ग्राहकांच्या विश्वासाला सर्वोच्च प्राधान्य देत सुवर्णविश्वात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे दंडे गोल्ड अँड डायमंड्स!

सोने हा केवळ मौल्यवान धातू नाही, तर प्रत्येक कुटुंबाच्या भावना, संस्कृती, परंपरा आणि आयुष्यातील अविस्मरणीय क्षणांशी जोडलेला अनमोल ठेवा आहे. लग्नसोहळा असो, सण-उत्सव असोत किंवा आयुष्यभर जपून ठेवावी अशी एखादी खास आठवण; प्रत्येक प्रसंगी सोन्याचे दागिने आनंदाला अधिक झळाळी देतात. अशा या सुवर्णविश्वात शुद्धता, विश्वास आणि दर्जेदार सेवेला प्राधान्य देत दांडे गोल्ड अँड डायमंड्सने आपल्या प्रदीर्घ परंपरेचा ठसा उमटवला आहे.

परंपरेचा वारसा, विश्वासाची शिदोरी

सन १९२७ पासून सुरू झालेला हा प्रवास म्हणजे काळानुसार बदलत गेलेल्या सुवर्णव्यवसायाची आणि ग्राहकांशी जपलेल्या विश्वासाच्या नात्याची कहाणी आहे. जवळपास शतकभराच्या या परंपरेत गुणवत्ता, पारदर्शक व्यवहार आणि ग्राहकांचे समाधान यांना महत्त्व देण्यात आले आहे. बदलत्या काळानुसार आधुनिकतेची कास धरतानाच पारंपरिक मूल्ये जपण्याचा प्रयत्न या सुवर्णदालनाच्या वाटचालीत दिसून येतो.

दागिन्यांचे वैविध्यपूर्ण आणि आकर्षक विश्व

दंडे गोल्ड अँड डायमंड्समध्ये ग्राहकांच्या आवडीनिवडींना अनुरूप दागिन्यांची विस्तृत श्रेणी उपलब्ध आहे. २४, २२, १८, १४ आणि ९ कॅरेटमधील सोन्याचे दागिने, आकर्षक हिऱ्यांचे दागिने, ९२.५ शुद्धतेच्या चांदीचे दागिने, नवरत्ने आणि चांदीच्या भेटवस्तू व पूजासाहित्य अशा विविध पर्यायांमुळे प्रत्येक खरेदीला खास स्वरूप प्राप्त होते.

कंपनीच्या माहितीनुसार, सोन्याच्या दागिन्यांचे ३५ हजारांहून अधिक, हिऱ्यांच्या दागिन्यांचे ५ हजारांहून अधिक आणि चांदीच्या दागिन्यांचे १० हजारांहून अधिक डिझाइन्स उपलब्ध आहेत. पारंपरिक कलाकुसरीपासून आधुनिक फॅशनपर्यंत आणि दैनंदिन वापरापासून खास समारंभांपर्यंत, विविध गरजांसाठी येथे दागिन्यांचे पर्याय मिळतात. 'मागीना' या संग्रहातून महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि कलात्मक वारसा दागिन्यांच्या माध्यमातून साकारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

शुद्धतेला प्राधान्य, व्यवहारात पारदर्शकता

सोन्याचे दागिने खरेदी करताना ग्राहकांसाठी शुद्धता आणि विश्वासार्हता या सर्वाधिक महत्त्वाच्या बाबी असतात. सर्व दागिने इखड हॉलमार्क प्रमाणित असल्याचे कंपनीच्या पुस्तिकेत नमूद करण्यात आले आहे. जुन्या दागिन्यांच्या देवाणघेवाणीच्या वेळी ० टक्के घट या सुविधेचाही उल्लेख आहे. ग्राहकांना खरेदीचा विश्वासार्ह अनुभव देण्याच्या दृष्टीने या बाबींना महत्त्व आहे.

ग्राहकांसाठी बचत आणि विशेष लाभ

दागिन्यांची खरेदी अधिक नियोजनबद्ध करण्यासाठी 'सौभाग्यलक्ष्मी' योजनेचा पर्याय मांडण्यात आला आहे. नियमित बचतीच्या माध्यमातून भविष्यातील दागिन्यांच्या खरेदीचे नियोजन करता येते. त्याचबरोबर **"Loyalty+"** कार्यक्रमाद्वारे ग्राहकांना खरेदीवर लॉयल्टी पॉइंट्स मिळवून पुढील खरेदीत सवलतीचा लाभ घेण्याची संधी दिली जाते. या कार्यक्रमाशी १ लाख ४५ हजारांहून अधिक ग्राहक जोडले गेले आहेत.

व्यवसायासोबत सामाजिक बांधिलकी

व्यवसायाची प्रगती साधतानाच समाजाप्रती असलेली जबाबदारी जपण्यावरही भर देण्यात आला आहे. 'गोविंद दंडे फाउंडेशन'च्या माध्यमातून शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवले जातात. ५ हजारांहून अधिक वह्या-पुस्तकांचे वाटप, ६०० हून अधिक बचत गट व शैक्षणिक संस्थांना मदत आणि ७० हून अधिक दुष्काळग्रस्त गावांमध्ये पाणीवाटप केले आहे.



याशिवाय, नाशिक रोड शाखेतील 'ऐवज' दागिन्यांचे संग्रहालय हा दागिन्यांचा इतिहास आणि पारंपरिक कलाकुसर जतन करण्याचा विशेष उपक्रम आहे.

संगमनेरमध्येही सुवर्णसेवेचा विश्वास

नाशिक रोड, नाशिक, सिन्नर आणि संगमनेर येथे शाखांच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहोचणारे दंडे गोल्ड अँड डायमंड्स हे परंपरा, गुणवत्ता, आधुनिक डिझाइन्स आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम साधणारे सुवर्णदालन म्हणून आपली ओळख अधोरेखित करते. हिच ओळख आता संगमनेरकरांची देखील होत आहे. नाशिक रोड, टॉपटेन कॉम्प्लेक्स मध्ये अद्ययावत शाखा देखील सुरू झाली आहे.

शतकभराचा वारसा, दागिन्यांतील वैविध्य आणि विश्वासाच्या नात्याला दिलेले महत्त्व यांची सांगड घालत दांडे गोल्ड अँड डायमंड्सचा सुवर्णप्रवास पुढे जात आहे. कारण खऱ्या अर्थाने मौल्यवान असते ते केवळ सोन्याचे मूल्य नव्हे, तर त्या सोन्याशी जोडलेला विश्वास, भावना आणि नात्यांचा अनमोल ठेवा!

संजय आहिरे
उपसंपादक दैनिक युवावार्ता

